**CNRNo.MHSN06-000660-2022**

<u>नि.दि.दा.क्र.९१/२०२२</u>
शशिकला अरविंद ढवळेश्वर
**विरुध्द**
शशिकांत दत्तात्रय मोतुगडे वगैरे २

## <u>नि.दि.दावा क्र.९१/२०२२ मधील अर्ज नि.क्र.१५ वरील आदेश</u>

अर्ज हा प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे दाखल केलेला असून प्रतिवादी क्र.२ यांना जखम झाल्याने व त्यांची प्रकृती बरी नसल्याने त्यांच्यावर दवाखान्यात औषधोपचार सुरु होते व प्रतिवादी क्र.१ हे त्यांच्या सेवेत असल्याने प्रतिवादींना त्यांच्या विधीज्ञांची भेट घेऊन वेळेत माहिती देता आली नाही. त्यामुळे प्रतिवादींविरुध्द विना कैफियत असा आदेश झाला आहे. प्रतिवादी यांनी कैफियत देण्यास जाणुनबुजून विलंब केलेला नाही. प्रतिवादींची कैफियत दाखल करुन घेतल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट अर्ज नामंजूर झाल्यास प्रतिवादींचे पैशाने कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादी यांनी दाव्यात त्यांची कैफियत सामील करण्यास झालेला विलंब माफ होऊन कैफियत दाखल करुन घेण्यास विनंती केली आहे.

**२.** वादी यांनी प्रतिवादी यांच्या अर्जावर म्हणणे देऊन अर्जास विरोध केला. प्रतिवादींनी विलंबाबाबत कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नाही. सबब, वादीने प्रतिवादी यांचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**३.** दावा हा वाटपाकरिता व हक्कज्ञापनाकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांना दाव्यात त्यांची कैफियत दाखल करण्यास विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा प्रतिवादी क्र.२ हे आजारी असल्याने व प्रतिवादी क्र.१ हे त्यांच्या सेवेत असल्याने झाल्याचे दिसून येतो. नमुद कारणे व विलंबाचा कालावधी विचारात

घेता प्रतिवादी क्र.१ व २ यांची कैफियत अभिलेखावर आल्यास वादीचे कसलेही नुकसान होणार नाही. तसेच नैसर्गिक न्यायत्वाच्या दृष्टीकोनातून प्रतिवादी क्र.१ व २ यांना कैफियत देण्याची संधी देणे योग्य व न्यायाचे आहे. मात्र प्रतिवादीच्या विलंबामुळे झालेली गैरसोयही विचारात घेणे आवश्यक आहे. सबब, उभयतांमधील वाद अंतिमतः गुणदोषावर निकाली काढण्यासाठी प्रतिवादी क्र.१ व २ यांचा अर्ज रक्कम रु.२००/– खर्च म्हणून वादीस देण्याच्या अटीवर अर्जास झालेला विलंब माफ करणे न्याय्य व योग्य आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आ दे श

प्रतिवादी क्र.१ व २ यांनी वादीस रु.२००/– (रुपये दोनशे मात्र) खर्च म्हणून देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येतो.

NITESH MANAGENI BANDGAR
Digitally signed by NITESH MANAGENI BANDGAR
Date: 2023.01.12 11:16:47 +0530

मिरज. ( नितेश म. बंडगर )
दि.११/०१/२०२३ दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मिरज

**CNRNo.MHSN06-000660-2022**

C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file, are same word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | K. A. Udagave |
| Court. | : | Judicial Magistrate<br>F.C., Miraj |
| Dictation Date | : | 11.01.2023 |
| Order signed by<br>the Presiding Officer on. | : | 11.01.2023 |
| Order uploaded on. | : | 12.01.2023 |